# आयसीआयसीआयचा रिटायरमेंट फंड

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. १२ : आयसीआयसीआय प्रुडेंशिअलने गुंतवणूकदारांसाठीच रिटायरमेंट फंडची घोषणा केली आहे. रिटायरमेंट फंडाच्या श्रेणीत कंपनीने तीन गुंतवणूक योजना जाहीर केल्या असून, त्यामध्ये २१ फेब्रुवारीपर्यंत गुंतवणूकदारांना अर्ज करता येईल.

निवृत्त होणाऱ्यांसाठी म्युच्युअल फंडातील गुंतवणूक फायदेशीर ठरत आहे. त्यामुळे म्युच्युअल फंड कंपन्या रिटायरमेंट फंडांना प्राधान्य देत आहेत. आयसीआयसीआय प्रुडेंशिअलच्या रिटायरमेंट फंडात गुंतवणूकदारांना किमान पाच हजारांची गुंतवणूक करता येईल. पहिल्या इक्विटी योजनेत २५ ते ४५ वर्षांमधील गुंतवणूकदारांना गुंतवणूक करता येईल, असे कंपनीने म्हटले आहे. हायब्रीड ॲग्रेसिव्ह प्लानमध्ये ४६ ते ५० वर्षांमधील नियमित उत्पन्नाच्या दृष्टीने गुंतवणूक करू.शकतात. हायब्रीड कन्झर्व्हेटिव्ह प्लानमध्ये ५१ ते ५६ वयोगटातील गुंतवणूकदारांना डेट आणि मनी मार्केट पर्यायामध्ये गुंतवणुकीची संधी मिळणार आहे. या योजनांमध्ये किमान पाच वर्षांचा गुंतवणूक कालावधी असून, त्यात फंड व्यवस्थापकांना गुंतवणूक करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो, असे मत इन्व्हेस्ट सर्चचे संस्थापक हिमांशू दानी यांनी सांगितले.